# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 04 April 2025

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०४ एप्रिल २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- वक्फ सुधारणा विधेयक २०२५ ला संसदेची मंजूरी, राज्यसभेत १२८ विरुद्ध ९५ मतांनी विधेयक संमत
- राज्यात सर्व विभागांच्या शाळांचं भौतिक सुविधांसह 'जियो टॅगिंग'करण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना
- एक मे पासून राज्यात 'फेसलेस नोंदणी', 'मुद्रांक नोंदणी' आणि 'वन स्टेट, वन रजिस्ट्रेशन' प्रणाली लागू होणार

  आणि
- राज्यात बहुतांश भागाला अवकाळी पावसाचा फटका, वीज कोसळून तीन जण ठार

****

वक्फ सुधारणा विधेयक २०२५ संसदेत पारित झालं. राज्यसभेत काल जवळपास १२ तासांच्या चर्चेनंतर या विधेयकाला मंजुरी देण्यात आली. सदनात १२८ सदस्यांनी विधयकाच्या बाजुने, तर ९५ सदस्यांनी विरोधात मत दिलं. लोकसभेनं परवा हे विधेयक संमत केलं होतं.

राज्यसभेत या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना, अल्पसंख्याक कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी, या विधेयकामुळे मुस्लिम समुदायातल्या करोडो निर्धन लोकांना लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला. या विधेयकातल्या तरतुदींनुसार वक्फ बोर्डात दहा सदस्यांपैकी दोन महिला असतील, असं त्यांनी सांगितलं,

**बाईट – अल्पसंख्याक कार्य मंत्री किरेन रिजिजू**

राज्य सरकारने 'मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते योजना' प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय काल जारी करण्यात आला. राज्यातले शेतकरी, घरकुल लाभार्थी आणि शासकीय बांधकामांसाठी शेततळी, पाझर तलाव, महसूली नाले आणि बंधाऱ्यांमधून निघणारा गाळ, माती, मुरूम आणि दगड विनामूल्य मिळणार आहे. या निर्णयामुळे शेतरस्ते सुधारण्यासाठी लागणारा मुरूम आणि माती शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होईल, ज्यामुळे शेतीला जोडणारे रस्ते मजबूत होतील, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राज्यात सर्व विभागांच्या शाळांचं भौतिक सुविधांसह 'जियो टॅगिंग' करण्याची सूचना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. विविध २२ विभागांच्या १०० दिवस आराखड्याचा आढावा घेतल्यानंतर ते काल बोलत होते. नामांकित शाळांच्या सद्य:स्थितीबाबत शिक्षण विभागाने पडताळणी करावी, प्रत्येक शासकीय कार्यालयाने जिल्हा नियोजनमधून आपल्या इमारतीचं सौर ऊर्जीकरण करावं, आदी सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

****

राज्यात येत्या एक मे पासून 'फेसलेस नोंदणी', 'मुद्रांक नोंदणी' आणि 'वन स्टेट, वन रजिस्ट्रेशन' प्रणाली लागू होणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल मुंबईत ही माहिती दिली. एखादी व्यक्ती नागपूरमध्ये घर घेत असल्यास पुण्याहूनही त्याची नोंदणी करता येईल, यासाठी आयकर प्रमाणपत्र आणि आधारकार्डाचा आधार घेतला जाईल, असंही त्यांनी सांगितलं. यामुळे भ्रष्टाचार कमी होईल, नागरिकांचा वेळ वाचेल आणि डिजिटल प्रक्रियेमुळे महसूल व्यवहार अधिक पारदर्शक होतील, असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला.

****

ऊसतोडणी मुकादम तसंच मजुरांचं संनियंत्रण करणाऱ्या सर्वसमावेशक कायद्याचा मसूदा तयार करण्याचे निर्देश, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. काल मुंबईत यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. ऊसउत्पादक शेतकऱ्यांचं आर्थिक नुकसान होऊ नये तसंच ऊसतोडणी मजुरांसह सर्वांच्या हक्कांचं रक्षण करण्याच्या उद्देशाने हा कायदा तयार करण्यात येणार आहे.

****

तुळजाभवानी मंदिरात येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, तसंच न्यायमूर्ती राजन कोचर आयोगाच्या शिफारसीनुसार आपत्ती व्यवस्थापनासाठी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात त्या बाबींचा समावेश करावा, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिले आहेत. तुळजापूर इथं काल श्री तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचं सादरीकरण बघितल्यानंतर त्या बोलत होत्या. तुळजापूर विकास आराखडा नागरिकांना विश्वासात घेऊन करावा, असं आवाहन गोऱ्हे यांनी केलं. त्या म्हणाल्या..

**बाईट – नीलम गोऱ्हे**

महिला बचत गट उत्पादकांची साखळी तयार करण्यासाठी धाराशिव इथं बचत गट भवन उभारण्यासाठी आमदार निधीतून २५ लाख रुपये निधी गोऱ्हे यांनी जाहीर केला. जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती करावी, शून्य आत्महत्या असलेला जिल्हा व्हावा, यासाठी सकारात्मक सार्वत्रिक प्रयत्न व्हावेत, तसंच अमली पदार्थांच्या गुन्ह्यात महिला लैंगिक शोषण आढळलं तर कडक कारवाई व्हावी असे निर्देशही दिल्याचं गोऱ्हे यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

****

बीड जिल्ह्यातल्या संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या विकास कामांचं भूमिपूजन काल पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते झालं. आजच्या तरूण पिढीने चुकीच्या गोष्टींच्या आहारी न जाता स्वतःची प्रगती साधावी, असा सल्ला मुंडे यांनी यावेळी दिला.

****

राज्याच्या अनेक भागात कालही अवकाळी पाऊस झाला. या पावसात वीज कोसळून तीन जण ठार झाले, तर शेती तसंच फळपिकांचं मोठं नुकसान झालं.

बीड जिल्ह्यातल्या केज तालुक्यात काल अवकाळी पाऊस झाला. या दरम्यान केकानवाडी शिवारात वीज कोसळल्याने देविदास केकान या शेतकऱ्याचा मृत्यू झाला तसंच एक गाय देखील दगावली. भंडारा जिल्ह्यात तुमसर तालुक्यातल्या पाथरी इथं वीज कोसळून दोन मजुरांचा मृत्यू झाला.

हिंगोली जिल्ह्यातल्या अनेक भागात काल अवकाळी पाऊस झाला, या पावसाने शेतात वाळवणीसाठी ठेवलेली हळद भिजल्याने शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं.

छत्रपती संभाजीनगर शहरासह जिल्ह्यात अनेक भागात काल संध्याकाळच्या सुमारास जोरदार पाऊस झाला. वैजापूर जिल्ह्यातल्या करंजगाव इथं गारपीट झाल्याचं वृत्त आहे.

जालना शहरासह जिल्ह्यातल्या बहुतांश भागात रात्री मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला.

लातूर जिल्ह्यातल्या बहुतांश भागात अवकाळी पाऊस पडला. वादळी वारे, मेघगर्जनेसह जिल्ह्यात या अवकाळीची संततधार रात्री उशिरा पर्यंत होती. अनेक ठिकाणी काढणीला आलेली ज्वारी आडवी झाली. तर अनेक ठिकाणी फळबागांचं विशेषतः आंब्याच्या झाडांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. औसा शहरात गारा पडल्याचंही वृत्त आहे.

धाराशिव, तसंच अहिल्यानगर जिल्ह्यातही काल जोरदार पाऊस झाला.

दरम्यान, राज्यात जवळपास सर्वच भागात आजही अवकाळी पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या पावसामुळे राज्यात तापमानात काही अंशी घट झाली. काल सर्वात जास्त ३८ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस तापमान ब्रह्मपुरी इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर इथं ३२ पूर्णांक दोन, नांदेड तसंच धाराशिव इथं ३७, तर परभणी इथं ३८ पूर्णांक तीन अंश तापमानाची नोंद झाली.

****

लातूर-तुळजापूर मार्गावर औसा तालुक्यातल्या बेलकुंड जवळ ट्रक आणि आयशर टेम्पोच्या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला. काल रात्री बंद पडलेल्या ट्रकची दुरूस्ती सुरू असताना भरधाव वेगातला आयशर टेम्पो ट्रकला धडकल्याने हा अपघात झाला.

****

महसूल विभागाच्या "जिवंत सातबारा मोहिमे"ला हिंगोली जिल्ह्यात गती मिळाली आहे. जिल्ह्यात एक एप्रिल पासून सर्व ग्रामपंचायतीमध्ये चावडी वाचनाला सुरुवात झाली आहे. याबाबत अधिक माहिती देत आहेत, आमचे वार्ताहर...

**बाईट – वार्ताहर रमेश कदम हिंगोली**

****

नांदेड जिल्हा पोलीस दलाने काल शहरातल्या सहा पोलिस ठाणे हद्दीत दोनशे आरोपींच्या घरांची झडती घेऊन, ६५ धारदार शस्त्र जप्त केली. या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिली.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या कृषी उत्पन्न बाजार समितीला अ ३ श्रेणी देण्यात आली आहे. बाजार समितीचे एकूण उत्पन्न, खर्च, वाढवा, तूट आदीचा विचार करून हे वर्गीकरण करण्यात येतं. जिल्ह्यात खुलताबाद कृषी उत्पन्न बाजार समितीला ड वर्ग, गंगापूर, कन्नड, पैठण बाजार समित्यांना अ १, तर फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीला ब वर्ग देण्यात आला आहे.

****

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात धाराशिव जिल्हा सलग तिसऱ्या वर्षी राज्यात अव्वल स्थानी तर मराठवाड्यात प्रथम क्रमांकावर राहिला आहे. २०२४–२५ या वर्षात जिल्ह्याला ७२३ उद्योगांचं उद्दिष्ट दिलेले असताना प्रत्यक्षात ७९९ उद्योजकांनी या योजनेचा लाभ घेऊन व्यवसाय उभारल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात महिलांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून राबवण्यात येत असलेल्या नवसंजीवनी उपक्रमात एकही संशयित कर्करोगग्रस्त महिला औषधोपचारापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याची सूचना, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी दिल्या. सेनगाव तालुक्यातल्या गोरेगाव इथं काल तालुकास्तरीय संजीवनी अभियानाचं उद्घाटन केल्यानंतर त्या बोलत होत्या. यावेळी झालेल्या शिबिरात ६७ महिलांची तपासणी करण्यात आली.

****